# मेट्रो-३ स्थानकाच्या ब्रँडिंगमधून कमविणार दोनशे कोटी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ भुयारी मेट्रो सुरू होण्यास अजून अवकाश असताना त्याआधीच या मार्गावरील स्थानकांच्या नावाआधी आपल्या ब्रँडचे कंपनीचे नाव लावून चमकण्यासाठी विविध कंपन्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. हे ब्रँडचे हक्क विकून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दोनशे कोटी रुपये कमविले असल्याचे सूत्रांनी सांगितले. मेट्रो-३ मार्गिकेवरील पाच स्थानकांच्या नावाआधी कंपनीचे नाव किंवा लोगो लावून नॉन-फेअर रेव्हेन्यू योजनेंतर्गत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला वार्षिक ४० कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहेत. मेट्रो-३ कार्यान्वित झाल्यानंतर पुढील पाच वर्षांमध्ये पाच टक्के वाढ त्यात होणार असून त्यामुळे एकत्रित २१६ कोटी रुपयांचे उत्पन्न मुंबई रेल कॉर्पोरेशनला मिळणार आहे.